**ठळक बातम्या**

- गेल्या शतकभरात विविध पातळ्यांवर बदल होऊनही केंद्रीय लोकसेवा आयोगाची विश्वासार्हता अढळ राहिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्ट २०२६ आजपासून लागू

- पाकिस्ताननं अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्यात ९ जण ठार, ११ जखमी

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये नौकानयनात भारताला रौप्यपदक, एकूण पदकसंख्या ६३वर

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या गेल्या शतकभरातल्या प्रवासात प्रशासन, तंत्रज्ञान, अभ्यासक्रम, आणि इतर अनेक गोष्टींमध्ये बदल झाले, मात्र या संस्थेवरचा विश्वास अढळ राहिला, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित यूपीएससी, अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या शताब्दी सोहळ्याला संबोधित करत होते. केवळ पदाच्या आकर्षणामुळे नव्हे, तर लोकसेवेच्या भावनेने प्रेरित युवा पिढीला या सेवेत सामावून घेण्याची गरज असल्याचं ते यावेळी म्हणाले. २१ व्या शतकातला भारत, आज नवीन कार्यसंस्कृतीसह पुढे जात असून, ‘जन-केंद्रित, सक्रिय सुशासन’, हे याचं प्रमुख सूत्र असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड...बाईट - प्रधानमंत्री**

यूपीएससी च्या शतकपूर्ती सोहळ्या निमित्त, प्रधानमंत्री मोदी यांनी आज एक विशेष नाणं, टपाल तिकीट आणि ‘हन्ड्रेड लँडमार्क जजमेंट्स - शेपिंग द पॉलिसीज ऑफ यूपीएससी अँड पब्लिक सर्व्हिस कमिशन्स इन इंडिया’, या शीर्षकाचं पुस्तक

प्रकाशित केलं. आजच्या कार्यक्रमाने गेलं वर्षभर चाललेल्या या यूपीएससीच्या शतकमहोत्सवी सोहळ्याची सांगता झाली.

<><><><>

बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्ट २०२६ आजपासून लागू झाला आहे. राष्ट्रपतींनी १३ ऑगस्ट रोजी या कायद्याला मंजुरी दिली होती. हा नवीन कायदा बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्ट, १८९१ ची जागा घेईल. हा कायदा बँकिंग नोंदींचा पुरावा म्हणून वापर करण्यासाठी आधुनिक कायदेशीर चौकट उपलब्ध करून देणार आहे. सध्याच्या बँकिंग व्यवस्थेच्या गरजांनुसार कायदेशीर चौकट आधुनिक करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. नवीन कायद्यानुसार प्रत्यक्ष, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, व्हर्च्युअल, क्लाउड-आधारित तसंच इतर आधुनिक स्वरूपात ठेवण्यात आलेल्या बँकिंग नोंदींना मान्यता देण्यात आली आहे.

<><><><>

आगामी दिवाळीच्या काळात फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची शक्यता सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली असून, याबाबत समतोल दृष्टिकोन स्वीकारला आहे. दिवाळीच्या सणाला विशिष्ट प्रकारच्या फटाक्यांच्या वापराला परवानगी दिली जाईल, मात्र, त्यासाठी वेळेचे निर्बंध घातले जातील, असं न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या पिठानं यावेळी सांगितलं.

राजधानी दिल्ली आणि उत्तरेकडच्या इतर राज्यांमध्ये वायुप्रदूषणाच्या काळात फटाक्यांवर बंदी घालण्यात आली होती. त्याबाबतच्या एका याचिकेवर सुनावणी दरम्यान न्यायालयानं हा निर्णय दिला. धार्मिक भावना आणि वायुप्रदूषणाचे गंभीर परिणाम यामध्ये समतोल साधण्याची गरज असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

<><><><>

अहमदाबाद इथे २००८मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेच्या सदस्याच्या फाशीच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या प्रकरणात दोषी असलेल्या अहमद बावा याने आपल्या फाशीच्या शिक्षेविरोधात केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह आणि संदीप मेहता यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. बावा याला शिक्षा देणाऱ्या कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजाचा वृत्तांत सादर करावेत असे निर्देश देत शिक्षेच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा आणि सतत समर्पणभाव' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, सौर उर्जा क्षेत्रातल्या धोरणांविषयी...

**होल्ड... व्हीसी**

*भारताच्या सौर ऊर्जा क्षेत्रातल्या धोरणांसाठी सुरुवातीच्या काळात गुजरात हे प्रायोगिक क्षेत्र ठरलं. मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली, सौर ऊर्जेसाठी स्वतंत्र धोरण राबवणारे गुजरात हे पहिलं राज्य बनलं. राज्य पातळीवरचा हा प्रयोग देशातील एका मोठ्या परिवर्तनाचा भाग बनला. २०१४ मध्ये केवळ २ पूर्णांक ८ दशांश गिगावॅट असलेली भारताची स्थापित सौर ऊर्जा क्षमता जुलै २०२६ पर्यंत जवळपास १६५ गिगावॅटपर्यंत पोहोचली आहे; यामुळे सौर ऊर्जा हा भारताच्या अक्षय ऊर्जा क्षमतेचा सर्वात मोठा घटक बनला आहे. त्यापुढचं पाऊल होतं सौर ऊर्जेला ग्रीडपासून थेट घराघरांत पोहोचवणं. २०२४ मध्ये सुमारे ७५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तरतूद असलेली 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' सुरू करण्यात आली. ऑगस्ट २०२६ पर्यंत या योजनेचा लाभ ५१ लाखांहून अधिक कुटुंबांनी घेतला असून १४ पूर्णांक ८ दशांश गिगावॅट क्षमतेचे रूफटॉप म्हणजेच छपरावरचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. जवळपास १९ लाख कुटुंबांचे वीज बिल 'शून्य' आलं आहे. या दूरदर्शी धोरणाचा विस्तार ग्रामीण भागातील ऊर्जा-स्वयंपूर्णतेपर्यंतही झाला आहे. 'पीएम-कुसुम' योजनेच्या समन्वयातून, शेतकरी सौर ऊर्जेवर चालणाऱ्या सिंचन पद्धतीकडे वळू शकतात; यामुळे डिझेलवरचं अवलंबित्व कमी होऊन शेतीचा आवर्ती खर्चही कमी होतो. केवळ 'पीएम सूर्य घर' योजनेमुळे उत्पादन, प्रक्रिया, लॉजिस्टिक्स, वित्तपुरवठा आणि देखभाल या क्षेत्रांत सुमारे १७ लाख रोजगार निर्माण होण्याचा अंदाज आहे.*

<><><><>

पाकिस्ताननं अफगाणिस्तानच्या कुनार आणि हेलमंद प्रांतांतल्या नागरी वस्तीवर काल केलेल्या हवाई हल्ल्यांत किमान ९ जण ठार तर ११ जण जखमी झाल्याची माहिती तालिबानच्या प्रवक्त्यानं दिली. पाकिस्ताननं देशांतर्गत राजकीय आणि आर्थिक समस्यांपासून लक्ष विचलित करण्यासाठी अफगाणिस्तानवर हल्ले केल्याचा आरोप त्यांनी केला. तसंच, या हल्ल्याला अफगाणिस्तानकडून ‘योग्य प्रत्युत्तर’ दिलं जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

<><><><>

अमेरिकन लष्कराची अंतिम तुकडी इराक मधून बाहेर पडत असून, 'ऑपरेशन इनहेरंट रिझॉल्व्ह'ची अधिकृतपणे सांगता होत असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल जाहीर केलं. ‘आयसिस’ या दहशतवादी संघटने विरोधातला हा निर्णायक विजय असून, अमेरिकेबरोबरच इराकचा देखील हा विजय असल्याचं त्यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं. या माघारीबरोबरच अमेरिकेचा इराकमधला गेल्या दोन दशकांपेक्षा जास्त काळ चाललेला लष्करी हस्तक्षेप संपुष्टात येत असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धांच्या १२व्या दिवसाची सुरुवात भारतानं आज पदकतालिकेत आणखी भर घालत केली. भारतानं आज नौकानयन प्रकारात पहिलं पदक पटकावलं. मनु फ्रान्सिस आणि प्रिन्स कुरिसिंकल नोबल या जोडीनं पुरुषांच्या स्किफ प्रकारात रौप्यपदक मिळवलं. तिरंदाजीत पुरुष गटाच्या कपांउंड प्रकारात गणेश मणिरत्नम तिरुमुरू याने कांस्यपदक पटकावलं. स्क्वॉशमध्ये महिलांच्या सांघिक उपांत्य फेरीत भारताला हाँगकाँगकडून १-२ असा पराभव पत्कारावा लागला आणि भारताला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. सेपकटकरॉ या खेळात पुरुषांच्या क्वाड्रंट प्रकारात भारतानं व्हिएतनामचा २-०

असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यामुळे भारताचं अजून एक पदक निश्चित झालं आहे. हॉकीमधे पुरुष गटाच्या उपांत्य फेरीत भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. तर, भारतीय महिला हॉकी संघानं चीनविरुद्ध होणाऱ्या सुवर्णपदकाच्या सामन्यात आधीच आपलं स्थान निश्चित केलं आहे. क्रिकेटमध्ये गतविजेता भारत पुन्हा मैदानात उतरणार असून श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाचा अंतिम फेरीतला सामना पाकिस्तानशी होणार आहे. भारताच्या पदकांची एकूण संख्या ६३ वर पोहोचली असून त्यात १० सुवर्ण, २२ रौप्य आणि ३१ कांस्यपदकांचा समावेश आहे. भारत सध्या पदकतालिकेत ८व्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

कर्नाटकचा किनारपट्टी भाग, केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल मध्ये आज जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये देखील जोरदार पाऊस पडेल, तर रायलसीमा, आंध्र प्रदेशचा किनारपट्टी भाग, ओडिशा, अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये वादळी वारे आणि मेघगर्जनेसह  पाऊस पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**